# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३५५/२०२४ दिनांक २७/०९/२०२४

# प्रेस नोट

## "ॲन्टी आयर्न मेंकिग कॉईन तयार करुन देतो ते विकत घेतल्यावर बाजारात चांगले पैसे मिळतात असे लोकांना भासवुन त्यांचेकडुन पैसे घेवुन फसवणुक करणा-या आतंरराज्य टोळीला जेरबंद करण्यास नयानगर पोलीस ठाण्यास यश !!"

नयानगर पोलीस ठाणे येथे दिनांक - २५/०८/२०२४ रोजी ते दिंनाक २१/०९/२०२४ पावेतो मिरारोड रेल्वे स्टेशन परिसरातील अरफा हॉटेल नयानगर मिरारोड पुर्व ता.जि ठाणे येथे सदरचा गुन्हा घडला असून यातील आरोपीत यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी यांना ॲन्टी आयर्न मेंकिग कॉईन बनविण्यासाठी विशिष्ठ प्रकारचे केमीकल आणुन त्याची निर्मीती करुन सदरचा कॉईन बाजारात विक्री केल्यास अधिक पैसे मिळतात असे सांगुन फिर्यादी याच्यावर दबाव आणुन अधिक पैशाची अमिष दाखवुन फिर्यादी यांचेकडुन ५०,०००/रु पैसे घेवुन रोख रक्कमेची फसवणुक केली म्हणून दिनांक- २२/०९/२०२४ नयानगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ३९५/२०२४ भारतीय न्याय सहिंता कलम ३१८(४),३(५) प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

मा.वरिष्ठांनी सदर घटनेची गंभीरतेने दखल घेवुन मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-१ मिरारोड, मा.सहा पोलीस आयुक्त सो, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नयानगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मा. विलास सुपे यांनी, त्यांचे अधिपत्या खालील पोनि/दिलीप राख व पोलीस निरीक्षक अब्दुलहक देसाई तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.निरी./पराग भाट, व अंमलदार यांना तपासकामी सविस्तर सुचना देवुन रवाना केले.

सदर पथकाने गुन्हा घडलेल्या परीसरातील सी सी टी व्ही फुटेज चेक करुन, तांत्रीक तपासा आधारे तसेच गुप्त बातमीदारांचे मार्फतीने यातील आरोपींत याचा कसोशीने शोध घेवुन आरोपीत नामे कपील हरीषचंद सिकोरीया वय ३७ वर्षे, व्यवसाय टेलर, रा. मारु निवास चाळ, रुम नं २०, ७ नं मश्जिद जवळ, कार्टर रोड नं ७, बोरीवली पुर्व यास ताब्यात घेवुन त्यास अटक करुन त्यास विश्वासात घेवुन त्याचे साथीदार याची नावे निष्पन्न करुन त्याना ताब्यात घेतले त्याची नावे १) सुरज नामदेव मोरे वय ४१ वर्षे, व्यवसाय टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, रा. एसपेरंन्स बिल्डींग, तळमजला, प्लॅट नं १, लिपोरा स्ट्रिट, क्रॉस गार्डन, भाईंदर पश्चिम २) किरण कालुभाई परमार वय ३३ वर्षे, व्यवसाय दलाल, रा. न्यु सनराईज बिल्डींग, भारती विद्यालय शाळेजवळ, कस्तुरी पार्क, आरएमपी पार्क, नवघर रोड, भाईंदर पुर्व ३) सनी सुहास दत्ता वय २४ वर्षे, रा. एसपेरंन्स बिल्डींग, तळमजला, प्लॅट नं १, लिपोरा स्ट्रिट, क्रॉस गार्डन, भाईंदर पश्चिम मुळपत्ता बारासत, दत्तबुगुर, अरविंदपुल्ली, कलकत्ता यास निष्पन्न करुन गुन्हयात अटक केली.सदर आरोपीताकडे कौशल्यपुर्वक तपास करता त्याने गुन्हयाची कबुली देवुन त्यांनी सागितले की, त्यांनी मिळुन लोकाना ॲन्टी आयर्न मेकीग कॉईन विकत घेतल्यावर त्याची बाजारात मोठी किंमत मिळते फायदा होतो असे कॉईन हे केमीकल वापरुन तयार करण्याकरीता पैसे मोजावे लागत असुन ॲन्टी आयर्न मेंकिग कॉईन चे कामाकरीता आम्ही कोल्हापुर, ठाणे, वसई, नालासोपारा, चिपळुन, पुणे, लातुर, भांडुप या भागात मित्रांकडुन लोकाच्या पाटर्या आनुन त्यांना त्याचे भागात भेटुन त्यांचा विश्वास सपांदन करुन त्यांना ॲन्टी आयर्न कॉईन तयार करुन देतो असे भासवुन त्याचेकडुन लाखो रुपये घेवुन फसवणुकीचे काम करत होतो. गुन्हयाचे तपासात फिर्यादी यांचे व्यतिरिक्त इतर ०२ लोकांचीही अशीच वरील प्रमाणे

फसवणुक होवुन त्यांचेकडुन वरील आरोपीतांनी ८,००,०००/रु घेवुन फसवणुक केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

यातील आरोपीत हे त्यांच्या ओळखीच्या लोकांना विश्वासात घेवुन अँन्टी कॉईन चे महत्व सांगुन त्यांना विकत घेणेकरीता सांगुन लोकांना एक तांब्याचा कॉईन दाखवुन त्यावर केमीकल, ग्लीसरीन, पावडर, मुलतानी माती, पॅरामॅगनेशन पावडर लाल रंगाची, कॉपर सल्फेट पावडर निळया रंगाची, ऑईल असे वापरुन एका रुम मध्ये सर्व सेटअप बसवुन तोंडावर मास्क लावुन हातात ग्लोज घालुन लोकाना दुर उभे करुन जवळ येवु नका नाहीतर केमीकल खुप स्ट्रांग आहे त्यामुळे कॅन्सर होवु शकतो असे सांगुन टेबलावर सर्व साहीत्य ठेवुन त्यावर मॅगनेट ठेवुन त्यावर कापुस अथंरुन त्यावर फॉईल पेपर लावुन त्याचेवर ताब्याचे काईन ठेवुन लोकांना त्यावर सुई धागा घेवुन तो कॉईन वर धरला असता खाली असलेल्या मॅगनेट मुळे सुई ६० डिग्री फिरत असल्याचे भासवुन लोकांना कॉईन काम करत असल्याचे पटवुन देत त्यांची फसवणुक करणे अशा प्रकारची त्यांची गुन्हयाची एमओबी आहे.सदर आरोपींची दिनांक २७.०९.२०२४ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर असुन गुन्हयाचा अधिक तपास सपोनिरी पराग भाट हे करीत आहेत.

तरी अशा प्रकारच्या अमिषांना बळी न पडण्याची तसेच अशा प्रकारे कोणाची फसवणुक झालेली असल्यास नयानगर पोलीस ठाण्याशी संपर्क करण्याचा याव्दारे सर्व सामान्य जनतेस आवाहन करण्यात येत आहे.

**वरील कामगीरी मा. पोलीस उप आयुक्त श्री. प्रकाश गायकवाड परीमंडळ - १ मिरारोड, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. राजेंन्द्र मोकाशी, नवघर विभाग, श्री विलास सुपे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पो.निरी. देसाई (क्राईम) नयानगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि पराग भाट, पो.उप-निरी.महेंन्द्र लोणे, पो.उप-निरी. धनंजय गायकवाड, सफौ.राजेश काळपुंड, पोहवा/विकास यादव, पोहवा.विजय गुरव, पो.हवा.महेश खामगळ, पोहवा/प्रमोद केंन्द्रे, पो.अंम/मनोज साबळे, पो.अंम/बाळासाहेब पाटील, पो.अंम/सौरभ इंगळे, पोअंम/रेहमत पठाण, पोअंम/समीर वाळुंज, पोअंम/विकी पवार यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.**




-----ooo-----